आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१४ जून २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज इटलीमधे विविध देशांच्या नेत्यांशी करणार द्विपक्षीय चर्चा

- लोकसभा सभापतीपदाची निवडणूक येत्या २६ जून रोजी

- पाच दिवसांच्या वार्षिक हज यात्रेला आजपासून प्रारंभ

- नीट परीक्षेसंदर्भात दाखल याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाच्या एनटीए, केंद्रसरकार, बिहार राज्यसरकार आणि सीबीआयला नोटिसा

- क्रिकेट मॅच आणि लोकसभा निडवणुकीत सट्टा लावल्याबद्दल मुंबईतल्या ऑनलाईन ॲपवर सक्तवसुली संचालनालयाचे  छापे.

**<u>आणि</u>**

- बुद्धीबळपटू दिव्या देशमुखला कनिष्ठ गटातील मुलींच्या जागतिक अजिंक्यपद बुद्धीबळ स्पर्धेत विजेतेपद

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज इटलीमध्ये विविध देशांच्या प्रमुखांशी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. G 7 परिषदेच्या निमित्ताने ते इटलीमध्ये गेले आहेत. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉं, ब्रिटनचे प्रधानमंत्री ऋषी सुनक, जर्मनीचे चान्सलर ओलाफ शोल्झ, इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी, जपानचे प्रधानमंत्री फुमियो किशिदा आणि युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर झेलेन्स्की यांच्यासोबत प्रधानमंत्री मोदी चर्चा करतील. तिसऱ्यांदा प्रधानमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर मोदी यांचा हा पहिलाच परदेश दौरा आहे.

<><><><>

१८व्या लोकसभेच्या सभापतीपदासाठी येत्या २६ जूनला निवडणूक होणार आहे. संसदेचं पहिलं अधिवेशन २४ जून ते ३ जुलै या कालावधीत होणार असून या अधिवेशनात नवनिर्वाचित खासदारांना सदस्यत्वाची शपथ देण्यात येईल. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू संसदेच्या दोन्ही सभागृहांना संयुक्तपणे संबोधित करतील. राज्यसभेचं अधिवेशन २७ जूनपासून सुरु होणार आहे.

<><><><>

सिक्किमचे मुख्यमंत्री प्रेम सिंग तमांग यांनी सोरेंग चाकुंग मतदारसंघाच्या आमदारकीचा राजीनामा दिला आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत दोन मतदारसंघात विजयी झाल्यामुळे त्यांनी हा राजीनामा दिला आहे. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार दोन मतदार संघात विजयी झालेल्या उमेदवाराला निकाल लागल्यापासून १४ दिवसांच्या आत एका मतदारसंघाचा राजीनामा द्यावा लागतो.

<><><><>

पाच दिवसांच्या वार्षिक हज यात्रेला आजपासून सुरुवात झाली. या यात्रेसाठी जगभरातून सुमारे २० लाख यात्रेकरू सौदी अरेबियात मीना इथं एकत्र जमले आहेत. यात एक लाख ७५ हजार भारतीय यात्रेकरूंचाही समावेश आहे आणि यातले १ लाख ४० हजार २० यात्रेकरू भारतीय हज समितीच्या माध्यमातून यात्रेसाठी गेले आहेत. या वर्षी पाच हजार भारतीय महिला यात्रेकरू मेहराम, अर्थात पुरुष सोबत्याविना हज करणार आहेत. हे सर्व यात्रेकरू मक्केहून मीना इथं पोहोचले आहेत. उद्या पहाटे ते अराफातच्या दिशेने रवाना होतील. भारतीय यात्रेकरूंच्या सोयीसाठी हज सुविधा हे मोबाइल ॲप उपलब्ध करून देण्यात आलं आहे.

<><><><>

वैद्यकीय आणि दंत वैद्यकीय प्रवेशासाठीच्या नीट परीक्षेत पेपरफुटी आणि अन्य गैरप्रकार झाल्याचा आरोप करत त्याची केंद्रीय अन्वेषण संस्थेमार्फत चौकशी

करण्याची मागणी करणाऱ्या विविध याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय परीक्षा संस्था तसंच केंद्र सरकारला नोटिसा बजावल्या आहेत. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप महेता यांच्या सुट्टीकालीन पीठाने सीबीआय आणि बिहार राज्यसरकारकडूनही जबाब मागितला असून त्याकरता दोन आठवड्यांची मुदत दिली आहे. नीट परीक्षेत पेपरफुटीचा आरोप करत त्याची सीबीआय चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या याचिका देशातल्या विविध उच्च न्यायालयांमधे दाखल झाल्या आहेत. त्यांची एकत्रित सुनावणी घ्यावी अशी विनंती राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं केली होती. त्यावर न्यायालयाने याचिकाकर्त्यांना आपलं म्हणणं मांडायला सांगितलं आहे. पुढची सुनावणी येत्या ८ जुलैला होणार आहे.

**<><><><><>**

येत्या २१ जून रोजी दहावा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा होणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्रिकोणासन करतानाचा व्हिडियो समाज माध्यमावर प्रसारित केला आहे. आरोग्यासाठी हे आसन कसं करावं याची माहिती त्यात प्रधानमंत्र्यां दिली आहे. खांदे, पाठ यांची कार्यप्रवणता सुधारण्यासाठी आणि एकाग्रता वाढीसाठी हे आसन करावं असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट सामन्यांचं अनधिकृत प्रसारण केल्याबद्दल तसंच क्रिकेट सामने आणि लोकसभा निवडणुकीच्या निकालावर सट्टा लावल्याबद्दल सक्तवसुली संचालनालयाने अर्थात इडीनं काल मुंबईतल्या ऑनलाईन ॲपवर छापे टाकले. या छाप्यात इडीनं रोख रक्कम, महागडी घड्याळं आणि  डिमॅट खाती असे एकूण ८ कोटी रुपये जप्त केले आहेत.

**<><><><><>**

टी -२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज सकाळी त्रिनिदादच्या ब्रायन लारा स्टेडियमवर झालेल्या सामन्यात अफगाणिस्ताननं पापुआ न्यू गिनीचा सात गडी

राखून पराभव केला. पापुआ न्यू गिनीनं दिलेलं ९७ धावाचं आव्हानं अफगाणिस्ताननं तीन गडी गमावून पूर्ण केलं.

काल झालेल्या सामन्यात इंग्लडनं ओमानला ८ गडी राखून हरवलं. नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करणाऱ्या ओमान संघाला इंग्लडनं केवळ ४७ धावांमध्येच गुंडाळलं. विजयासाठीचं ४८ धावांच माफक आव्हान इंग्लडनं केवळ ३ षटकात दोन गडयांच्या मोबदल्यात पूर्ण केलं.

**<><><><>**

भारताची बुद्धीबळपटू दिव्या देशमुख हिनं कनिष्ठ गटातील मुलींच्या जागतिक अजिंक्यपद बुद्धीबळ स्पर्धेत विजेतेपद पटकावलं आहे. गुजरातमध्ये गांधीनगर इथं काल झालेल्या अंतिम फेरीत तिनं बल्गेरियाच्या बेलोस्लावा क्रास्तेव्हा हिचा केवळ २६ चालीत पराभव केला. दिव्याचं जागतिक स्पर्धेतलं हे पहिलंच विजेतेपद आहे. दिव्यानं या स्पर्धेत ११ पैकी ९ सामने जिंकले तर दोन सामने बरोबरीत सोडवले.

**<><><><>**

स्लोव्हेनियात सुरू असलेल्या एफईआय ड्रेसाज विश्वचषक अश्वारोहण स्पर्धेत मध्ये भारताच्या श्रुती वोरा हिने ऐतिहासिक विजय मिळवत थ्री स्टार ग्रांट प्री विजेतेपद पटकावणारी पहिली भारतीय खेळाडू होण्याचा मान मिळवला आहे. सीडीआय-३ इव्हेंटमध्ये प्रतिस्पर्धी मोलदोवाच्या तातियाना अँटोनेन्को हिला पिछाडीवर टाकत तिने ६७ पूर्णांक ६१ शतांश गुण मिळवले. भारतीय अश्वारोहकांसाठी ही मोठी बातमी असून श्रुतीच्या प्रेरणादायी कामगिरीचा देशाला निश्चितच अभिमान वाटतो, अशी भावना भारतीय अश्वारोहण महासंघाचे सचिव जनरल कर्नल जैवीर सिंग यांनी व्यक्त केली आहे. श्रुतीने यापूर्वी २०२२ च्या ड्रेसेज विश्व कप स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केलं होतं. तसंच २०१०, २०१४मध्ये झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेतही सहभाग नोंदवला आहे.

**<><><><>**

कुवेतमध्ये इमारतीला लागलेल्या आगीत मरण पावलेल्या ४५ कामगारांचे मृतदेह विशेष विमानाने कोचीला आणण्यात आले आहेत. केंद्र सरकारने मृतांच्या वारसांना प्रत्येकी दोन लाख रुपये मदत देण्याची घोषणा केली आहे. तर केरळ सरकार मृतांच्या वारसांना प्रत्येकी पाच लाख आणि जखमींना प्रत्येकी एक लाख रुपये मदत देणार आहे. दरम्यान, मृतांमध्ये उत्तरप्रदेशमधल्या तीन कामगारांचा समावेश आहे. या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेश सरकार परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाशी सतत संपर्कात आहे.

**<><><><><>**

उत्तराखंडमध्ये अल्मोडा जिल्ह्यातल्या बिनसार वन्यजीव अभयारण्यात लागलेल्या भीषण आगीत अग्निशामक दलाच्या चार जवानांना आपला जीव गमवावा लागला तर अन्य चार जण जखमी झाले. जोरदार वाऱ्यांमुळे पसरलेल्या आगीत चार जवान होरपळून मृत्युमुखी पडले. जखमी जवानांना हल्दवानीच्या रुग्णालयात हलवण्यात आलं. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंग धामी यांनी घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृत जवानांच्या कुटुंबियांना १० लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पात स्वयंचलित पर्जन्यमान मापक वापरण्यात येणार आहे. बुलेट ट्रेन अधिक अधिक सुरक्षित करण्यासाठी ही प्रणाली वापरण्यात येणार असून यामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून पावसाची अचूक नोंद ठेवता येईल.

**<><><><><>**

मुंबई शहर आणि उपनगरांत आज  सकाळपासून पडणाऱ्या पावसामुळे अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी झाली आहे. पावसामुळे सिग्नल यंत्रणेत बिघाड झाल्यानं या वाहतूक कोंडीत अधिक भर पडली.

**<><><><><>**

महाराष्ट्र आणि गोव्यात पुढल्या चार दिवसात वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. यासह पश्चिम बंगाल, सिक्किम आणि ईशान्य भारतात जोरदार पाऊस पडेल असं हवामान विभागाने कळवलं आहे.

वायव्य, उत्तर आणि पूर्व भारतात उष्णतेची तीव्र लाट येणार असल्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे. तसंच पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, बिहार, छत्तीसगडमध्ये उष्णतेची तीव्र लाट येईल असं हवामान विभागाने सांगितलं आहे.

**//<><><><><>//**